# Golden Research Thoughts

International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 8 | Feb - 2016





# अध्ययन आणि अध्यनाचे स्त्रोत

## (Learning and Learning Resources)


**डॉ. कृष्णा पुंजाराम भदाणे**

**राजर्षी शाहू कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड) ताथवडे पुणे.**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.**


**प्रस्तावना-**

अध्ययन व अध्यापन हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्हीच्या उद्देश हा एकच असून तो ज्ञानप्राप्ती हा आहे. विद्यार्थी वर्गात अध्ययन करत असतांना बौध्दीक विकास होणे गरजेचे असते. व बौध्दीक विकास हा अध्ययन कर्त्याच्या ज्ञानरचनेवरून होत असतो. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नुसार ज्ञानरचना वाद पुरस्कृत केला आहे. [१]त्यानुसार विद्यार्थी हा ज्ञानाचा केवळ स्वीकारकर्ता आहे ही भूमिका बदल्याशिवाय शाळेतील अध्ययन हे विद्यार्थ्यांना आनंददायी ठरणार नाही. सध्याच्या परिस्थितीत काही अपवाद वगळता विद्यार्थ्यांला निष्क्रिय अध्ययनकर्ता गृहीत धरले जाते आणि वर्गात माहितीचे एकतफी प्रसारण होत असते कोणत्याही दडपणाशिवाय विद्यार्थी कसे अध्ययन करतील हे पाहणे ही राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००५) याचा मुख्य जिव्हाळ्याचा विषय आहे.

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखण्यात ज्ञानरचनावादाची अध्ययना विषयीचे मार्गदर्शक तत्वे पुढील प्रमाणे आहेत.** [१]




१. ज्ञानाची रचना म्हणजेच अध्ययन प्रक्रिया होय.
२. विद्यार्थी ज्ञानाची रचना करतात
३. अनुभवाच्या अर्थ लावणे, म्हणजे अध्ययन
४. पुर्वानुभवाच्या आधारे विद्यार्थी ज्ञानरचना करतात.
५. वातावरणाशी होणाऱ्या आंतर क्रियामधून विद्यार्थी ज्ञानरचना करतात.
६. स्थानिक परिस्थितीच्या माहितीचा शाळेतील ज्ञानरचनेच्या प्रक्रियेत महत्वाचा वाटा आहे.
७. एकमेव पाठ्यपुस्तक तयार करण्याची परंपरा मोडून एकाच इयत्तेच्या ऐकका विषयासाठी एकापेक्षा अधिक पाठ्यपुस्तके तयार करण्याची प्रथा सुरु केली पाहिजे.

जेव्हा जीवनाशी निगडीत प्रसंग, प्रक्रिया व व्यवहार अनुभवायला विद्यार्थ्यांना मिळतील तेव्हा त्यांना अशी आकलनाची संधी मिळेल की ज्यायोगे ते स्वतःच ज्ञानप्राप्ती करु शकतील व अध्ययन घडून येईल.

### ज्ञानरचनावादी अध्ययनाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे -

१. अध्ययन ही फक्त स्वीकारण्याची निष्क्रीय प्रक्रिया नसून, अर्थपूर्णरीत्या समस्या विमोचन करण्यासाठी ती नवीन अर्थनिर्मितीची सक्रीय आहे.
२. नवीन ज्ञाननिर्मिती ही विद्यार्थ्यांचा पुर्वज्ञानावर अवलंबून असते. कधीकधी नवीन माहितीचा अर्थ समजून घेण्यात पूर्वज्ञानाचा अडथळा होतो.
३. अध्ययन म्हणजे पुर्वप्रस्थापित संबंधांची संकल्पनांची पुर्नमांडणी होय
४. वर्ग अंतरक्रियामुळे ज्ञाननिर्मितीचा फायदा होतो.
५. नियोजनपूर्वक निश्चित केलेल्या अध्ययन कृतींच्या संदर्भ चौकटीत अर्थपूर्ण अध्ययन घडून येते.
६. ज्ञाननिर्मितीसाठी अध्ययन वातावरण आनंददायी असावे.
७. अध्ययनासाठी समृध्द आंतरक्रिया
८. अध्ययनासाठी कल्पनांची पुर्नमांडणी
९. अध्ययनासाठी सामाजिक समन्वय
१०. अध्ययनासाठी भाषिक आशयाची सर्वंकषता
११. अध्ययनासाठी संकल्पनाचा संदर्भ
१२. पंचज्ञानेद्रियांपासून हाणारे ज्ञानासंबधी अध्ययन.
१३. विविध संकल्पना परस्पर संबंधातून अध्ययन.

वरील अध्ययनाची मार्गदर्शक तत्वे व वैशिष्टांवरुन सर्व मानवप्राण्याला ज्ञानसंपन्न करण्यासाठी व ज्ञान मिळविण्याचे मार्ग ज्ञात होण्याचा उद्देशाने संबंधीत संशोधन लेख सादर करण्यात येत आहे.

### गरज व महत्व

अध्ययन हे मानवप्राण्याच्या ज्ञानप्राप्तीसाठीचे महत्वाचे माध्यम आहे. अध्ययन झाले नाही तर ज्ञाननिर्मिती होऊ शकत नाही. विद्यार्थी कोऱ्या पाटी प्रमाणे असतो. तो परिसर, शाळा, समाज, कुटुंबातून अध्ययन करीत असतो. त्यासाठी शिक्षक वर्गात अध्यापनाचा विविध क्लृप्त्यांचा वापर करून विद्यार्थ्यांला अध्ययन प्रवृत्त करीत असतात. म्हणून ज्ञान निर्मितीसाठी शालेय परिसर हा अध्यापनाच्या दृष्टीने महत्वाचा घटक आहे. म्हणून सदर संशोधन लेख सादर केला आहे. अध्ययन व अध्यापन प्रक्रिया घडून येण्यासाठी वर्गातील विद्यार्थी-शिक्षक, विद्यार्थी विद्यार्थी ही आदानप्रदानाची कार्यनीती महत्वाची आहे. म्हणून अध्ययनासाठी सुयोग्य होण्यासाठी खालील गोष्टी गरजेच्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | पृच्छा | - उदा. प्रश्न विचारणे / वस्तु, चित्र, सूत्र, संबोध इ. |
| २. | वर्गीकरण | - उदा. माहितीचे वर्गीकरण करणे. |
| ३. | विश्लेषण | - उदा. माहिती पुरेशी, संबंधीत आहे का? |
| ४. | शब्दजाल तयार करणे | - उदा. परस्परसंबंध जोडणे. |
| ५. | संकल्पना चित्रण | - संबंधीत मुद्दे, उदाहरणे, चित्र, आकलनासाठी तयार करणे. |
| ६. | मुक्तः प्रश्न | - उदा. विचार प्रवृत्त करणारे प्रश्न. |
| ७. | समस्या विमोचन | - समस्या सोडविण्यासाठी तोडगा शोधणे. |
| ८. | प्रायोगिकता | - प्रत्यक्ष कृषीद्वारे नियम, संबंध, सूत्राचा शोध लावणे. |

| | |
|---|---|
| ९. सहकार्यातून अध्ययन | - गटागटाने कार्य केल्यास अध्ययन चांगले होते. |
| १०. वातावरण निर्मिती | - उदा इतिहास, भाषा विषय शिकवितात. |
| ११. अध्यापन पद्धती | - घटकानुसार वापरणे. |
| १२. सदर्भग्रंथ सुची देणे | - विद्यार्थी विविध ग्रंथातून ज्ञान आत्मसात करतील. |
| १३. संबंधित मुद्दयाची पुर्नमांडणी करणे | - घटक लक्षात राहण्यास मदत होते. |

वरील अध्ययन अध्यापनासाठी आवश्यक वातावरण निर्मिती करण्यासाठी महत्वाच्या बाबी आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानसमृध्द बनविण्यासाठी विविध माध्यम पुढे येत आहेत. शाळा, धर्मशाळा, टी. व्ही. इंटरनेट, रेडिओ, E-learning, वर्तमानपत्रे, पुस्तके, अशा माध्यमातून विद्यार्थी अध्ययन करत असतो. म्हणून ज्ञानप्राप्तीसाठी संशोधकाने अध्ययन व अध्यायनाचे स्त्रोत या विषयावर लेख सादर केला आहे व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकासासाठी गरजेचा व महत्वपूर्ण असा आहे.

### अध्ययनासाठी खालील बाबी गृहित धरल्या आहे.

१. अनुभवातून अध्ययन होण्यास मदत होते.
२. अध्ययनात संकल्पनाचे अर्थनिर्वचन केले जाते
३. अनुभवांना अर्थ देण्याचा सक्रिय प्रक्रियेतून संकल्पना संबोध यांची निर्मिती होते.
४. सहभागी अध्ययनात संकल्पना अधिक स्पष्ट होतात

### अध्ययनाची उद्दीष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील -

१. विद्यार्थ्याला ज्ञानमतीसाठी मदत करणे.
२. विद्यार्थ्यांला संकल्पना समजण्यास मदत करणे.
३. विद्यार्थ्यांला प्राप्त ज्ञानाचा उपयोग नवीन ज्ञान मिळविण्यासाठी मदत करते.
४. विद्यार्थ्याला स्वतः मधील बौध्दिक क्षमता वाढविण्यास मदत करणे.
५. विद्यार्थ्यांला शोधनाद्वारे अध्ययनासाठी मदत करणे.
६. विद्यार्थ्याला अध्ययन अनुभूतीद्वारे ज्ञानप्राप्तीसाठी मदत करणे.
७. विद्यार्थ्यांला अध्ययनाद्वारे स्वतःचा विकास करण्यास मदत करणे.
८. विद्यार्थ्याला आपल्या कृतीद्वारे अध्ययनास मदत करणे.
९. विद्यार्थ्यांला वाचन, चिंतन, मनन, सराव व स्मरणातून अध्ययन घडवून आणणे.

### अध्ययन व्याख्या


- गॅरेट (Garret): नव्या परिस्थितीला प्रतिसाद देण्याचे आयोजन ज्या कृतीमुळे आपण करू शकतो ती कृती म्हणजे अध्ययन होय. [२]
- अध्ययन म्हणजे परिस्थितीला अनुलक्षून केलेल्या क्रियेमध्ये हेतूपूर्ण व टिकावू स्वरुपाचे बदल. [२]
- क्रो आणि क्रो- (अध्ययन म्हणजे सवयी, ज्ञान-वृत्तीचे संपादन होय)

- मर्फी - अध्ययन हा वर्तन बदल खरा पण त्याबरोबर पाहण्यातल्या किंवा आकलनातल्या दृष्टीचा त्यात समावेश होतो.[४]
- प्लेटो - आत्म्याचा विकास म्हणजे अध्ययन[४]
- ॲरिस्टॉटल - आत्म्याचा महत्वाचा शक्तीचा विकासाला जबाबदार असणाऱ्या प्रक्रिया म्हणजे अध्ययन.
- अध्ययन म्हणजे व्यक्तिचा वर्तन परिवर्तनाचा विकासशील बदल होय.[५]

## अध्ययन स्त्रोत व्याख्या-

- अध्ययनासाठी उपयुक्त असे मानवी, नैसर्गिक, भौतिक, घटक म्हणजे अध्ययनाचे स्त्रोत होय.
- अध्ययनाला चिंतन, मनन, स्मरण, याद्वारे ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक असणाऱ्या ज्ञानात्मक कृती म्हणजे अध्ययन स्त्रोत होय.

## अध्ययन स्त्रोताचे प्रकार –




## भौतिक घटक -

टिव्ही. रेडिओ, ओ.एच.पी व्हीसीडी प्लेअर, शै. साधने चित्रे, आकृत्या, फोन, लॅपटॉप, चित्रपट गृहे, वर्तमानपत्रे, मासिक, पुस्तके, हस्तलिखीते, शाळा, फळा, खळू, सॅटेलाईट, धर्मग्रंथ, आकाशवाणी, प्रयोगशाळा, धर्मशाळा, इ.

## मानवी घटक -

भाषा, विविध भागातील बोलीभाषा, संस्कृती, कुटुंब. समाज, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, वाचन, मनन, चिंतन, स्मरण, निरीक्षण, वर्गीकरण, विश्लेषण, सामान्यीकरण, फरक स्पष्ट करणे, संकल्पनाप्राप्ती, अध्यापन पद्धती, व्यक्तिचा समाजातील स्थर, शिक्षक, गुरु, मंदीर, मसजिद, चर्च, अध्ययन करणारी व्यक्ती, व्यक्तिची ज्ञानग्रहनाची क्षमता, शै अनुभूती, व्यक्ति जीवनाचे लक्ष, जिज्ञासावृत्ती, अभिनय, नाटक, किर्तन, प्रवचन, व्याख्यान, सेमिनार, कार्यशाळा, सभा, उत्सव, समारंभ, सन

## नैसर्गिक घटक

नैसर्गिक परिसर, शैक्षणिक वातावरण, नैसर्गिक घडामोडी, भूकंप, ज्यालामुखी, सागरीलाटा, ग्रहण, निसर्ग, सॅटेलाईट, वारा, तापमान, वायुदाब, पक्षांचा आवाज, नैसर्गिक परिस्थिती वातावरण, वीज चमकणे, वादळ, यामुळे अध्ययन घडून येते

ज्ञाननिर्मिती करण्यासाठी व्यक्तिला वाचन, चिंतन, मनन व स्मरण, करावे लागत असते. मानवाला एक दैवी देणगी लाभलेली आहे ती म्हणजे मेंदू व त्यातील बुध्दी यामुळे तो स्वतः चा ज्ञानग्रहणासाठी सराव, कृती, श्रम, वाचन करून स्वत:च्या अभिव्यक्तित बदल करत असतो. व्यक्ति, समाजात, कुटुंबात, व देशात वावरत असतांना जे जे अनुभव येतात त्यातुन त्याला ज्ञान मिळत असते. वर्गअध्यापन करताना शिक्षक विद्यार्थ्यांना भौतिक, नैसर्गिक व मानवी घटकाचा वापर करून विद्यार्थ्याला ज्ञानसंपन्न बनविण्यासाठी विविध अध्ययन क्लृप्त्या व अध्यापन पद्धती साधने वापरतात. अध्यापकाचे बोलणे, उदाहरणे,

दाखले, प्रयोगकृती विविध माध्यमाद्वारे अध्ययन करता येत असते त्यासाठी व्यक्तिला मनापासून अभ्यास व स्वाध्याय करणे गरजेचे आहे. अध्ययन हे व्यक्तिच्या आत्म्याद्वारे होत असते. एकाग्रता, श्रवण, वाचन, लेखन, भाषण, या उद्दीष्टाद्वारे ज्ञानात वृध्दी होत असते. निरिक्षणाद्वारे व प्रयोगाद्वारे प्रत्यक्ष ज्ञान मिळविण्यासाठी मदत होत असते. विविधतापूर्ण पाठ, शै. साधनाचा वापर, आवाजात आरोहअवरोह, युक्तपणा, चेहऱ्यावरील हावभाव, शारीरीक हालचाली वरून अवघड घटक सुध्दा सोपा करून विद्यार्थ्याला अध्यायनासाठी प्रवृत्त करून वर्गवातावरण शिक्षक निर्माण करु शकतो व अध्ययनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करता येतो.

संशोधकाने वर्गात मानसशास्त्राच्या अध्ययन उपपत्ती स्किनर, आसुबेल, पाव्हलाव्ह दिलेत. यांचा शिकविताना मुद्यांनुसार अध्यापन केले त्यांच्यावर वर्गात विविध उदाहरणे, दाखले, प्रश्नोत्तर व चर्चा पद्धतीचा वापर करून तो घटक अधिक समजून सांगितला. विद्यार्थ्यांना स्वतः अध्ययन उपपत्तीचे मुद्दे तयार करण्यास सांगून त्यांच्याकडून सेमिनार पद्धतीने प्रश्नोत्तर द्वारे व चर्चा पद्धीने वर्गात अंतरक्रिया घडून आणली. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन उपपत्ती समजण्यास मदत झाली. त्यांना त्या प्रश्नांमध्ये अधिक गुण मिळालेत म्हणून विद्यार्थ्यांचे अध्ययनासाठी वर्गअंतरक्रिया व अध्यापन खुप महत्वाचे आहे. शिक्षक वर्गात ज्या ज्या अध्ययन अनुभूतींचा अध्यापनात वापर करणार त्या पद्धीतीने विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास होत असतो.

## निष्कर्ष:

१. विद्यार्थी अध्ययन करत असताना त्यांना प्रश्न विचारल्यास शिक्षक विद्यार्थी अंतरक्रिया घडून विद्यार्थ्यांना घटक समजण्यास मदत होते.

२. विद्यार्थी अध्ययन करताना माहितीचे वर्गीकरण करून सांगितल्यास अध्ययन प्रक्रिया सुलभ होते.

३. विद्यार्थ्यांसमोर समस्या निर्माण करून त्यांना विचार प्रवृत्त केल्यास घटक समजण्यास मदत होते.

४. विद्याथ्यर्थ्यांना प्रयोगशाळेत स्वतः प्रयोग करून कृतीद्वारे अध्ययन केले तर त्यांना तो प्रयोग समजतो व अध्ययन प्रक्रिया सुखकर होते.

५. विद्यार्थ्यांना काही घटक गटाद्वारे शिकवले व प्रकल्प पध्दतीचा वापर केला व प्रत्यक्ष क्षेत्रभेट केल्यामुळे तेथील परिसरातील ज्ञान होते. त्यामुळे घटक समजण्यास मदत होते.

६. विद्यार्थ्यांना कंटाळवाणे अध्यापन आवडत नाही. त्याना अध्ययनात ज्याप्रमाणे अभिरुची असेल त्या पध्दतीने शिक्षकाने अध्यापन केल्यास वर्गवातावरण घडून येईल व त्यांचा गुणात्मक विकास होईल.

७. विद्यार्थ्यांना संकल्पना समजून सांगताना चित्रे, नकाशे, शैक्षणिक साधने दाखविल्यास त्या घटकाचे अध्ययन होण्यास मदत होते.

८. विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय दृष्टीने बुध्दिमत्ता व वयोगटाचा विचार करुन शिक्षकाने अध्यापन पध्दतीचा वापर केल्यास घटक अधिक समजण्यास मदत होते.

९. विद्यार्थ्यांना अवघड मुद्दा समजून सांगताना संबंधित मुद्द्यांची पुर्नमांडणी करुन चर्चा पध्दतीने अध्यापन केल्यास अध्ययनास मदत होते.

१०. विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय प्रयोग करताना प्रत्यक्ष कृती केल्यास अध्ययनास मदत होते.

११. विद्यार्थ्यांचा अध्ययनासाठी अध्यापन प्रतिमानांचा योग्य पायऱ्यानुरुप वापर केल्यास अध्ययन प्रक्रिया अधिक सुलभ होते.

१२. विद्यार्थ्यांना अध्ययन करताना दैनंदिन जीवनातील उदाहरणाद्वारे घटक समजून सांगितल्यास अध्ययन सुलभ होते व गुणात्मक विकास होण्यास मदत होते.

१३. अध्ययन करताना विद्यार्थ्यांना घटकाबद्दल विविध संदर्भ ग्रंथातून माहिती शोधण्यास सांगून त्यांचे अध्ययनास फायदा होतो व घटक अधिक समजतो.

१४. विद्यार्थ्यांना अध्ययन करताना नैसर्गिक वातावरण निर्माण केल्यास व वर्गखोली, वर्ग वातावरण शालेय परिसराचासुध्दा अध्ययनावर परिणाम होते व अध्ययन करण्यास विद्यार्थ्यांची अभिरुची वाढते.

१५. विद्यार्थी अध्ययनासाठी एखादया घटकांची माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचा वापर केल्यास त्याचे अध्ययन अधिक सुलभ होण्यास मदत होते.

**समारोप :-**

अध्ययन म्हणजे व्यक्तीने आपल्या ज्ञानाद्वारे स्वतः मध्ये घडवून आणलेला विकासात्मक बदल असतो. मानव प्राणी हा औपचारिक, अनौपचारिक व सहज शिक्षणाद्वारे अध्ययन करतो व स्तःच्या ज्ञानप्राप्तीसाठी त्याचा उपयोग करतो. व्यवहारात त्या ज्ञानाचा वापर करतो. कोणतीही गोष्ट अध्ययन करताना सराव, प्रत्यक्ष कृती, वाचन, चिंतन, मनन, संभाषण व सादरीकरण यातून ज्ञान हे झऱ्याचा पाण्याप्रमाणे पाझरते व त्यानुसार व्यक्तींचा अध्ययन कृतीद्वारा सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

**संदर्भसूची :-**

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (मार्च २०१०), शिक्षण संक्रमण पृ १०, ११, १२, १३
२. करंदीकर सुरेश (२००९), शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन पुणे पृ. १८.
३. कपोली, पाटील वामन (२००८), अध्यायन अध्यापनाचे मानसशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे.
४. जगताप ह. ना. (२००७), शैक्षणिक मानसशास्त्र, नरेंद्र प्रकाशन, पुणे पृ.क्र. ३६.
५. बडवे, शेवलेकर शारदा (२००४), विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपुर
६. गारजे, चिटणीस (२००७), अध्ययन अध्यापनाचे मानस शास्त्र व मानसशास्त्रीय प्रयोग नित्यनुतन प्रकाशन, पुणे.
७. चव्हाण किशोर, (२००९), विकास व अध्ययनाचे मानसशास्त्र, इनसाईट पब्लिकेशन, नाशिक